| | |
|---|---|
| | प्रकरण दाखल तारीख : १८/०७/२०१८<br>प्रकरण फैल तारीख : १८/०७/२०१८<br>प्रकरण निकाल तारीख : १२/०३/२०२६<br>कालावधी : वर्षे महिने दिवस<br>०७ ०७ २२ |

**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी एस.के.शेख यांचे समक्ष)

**न्यायनिर्णय**

**(निशाणी क्रमांक ३२/ब)**

(नियमीत फौजदारी प्रकरण क्र.४५/२०१८)

श्रीवर्धन पोलीस ठाणे प्रथम खबरी अहवाल क्र.०३/२०१८

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन**<br>तर्फे श्रीवर्धन पोलीस ठाणे<br>(सहा. सरकारी अभियोक्ता श्री. मुकेश पाटील) |
| आरोपी | १.**हवाबीबी अब्दुल रहेमान कुरवले**, (मयत)<br>२. **अब्दुल कादीर राऊत**, (मयत)<br>३. **अल्लाद्दीन उमर सनगे**, वयः ५५ वर्ष,<br>रा. जसवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड<br>(वकील श्री. वावेकर) |

| | |
|---|---|
| घटना तारीख | सप्टेंबर –२०१० पासून ते २५/०१/२०१८ |
| पहिली खबर दिनांक | २५/०१/२०१८ |
| दोषारोप दाखल दिनांक | १८/०७/२०१८ |
| आरोप निश्चितीचा दिनांक | २०/११/२०२५ |
| संपरीक्षा सुरु झाल्याचे दिनांक | २०/११/२०२५ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | ११/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय | १२/०३/२०२६ |

| | |
|---|---|
| अंतिम आदेश | आरोपीला निर्दोष करण्यात येते. |

## आरोपीची माहिती

| अ.क्र. | आरोपीचे नांव | आरोपीच्या अटकेचा दिनांक | जमानतीवर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेले गुन्हे | निर्दोष अथवा शिक्षा | शिक्षा | फौ.प्र.सं.चे कलम ४२८ अन्वये कारागृहात व्यतित केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | अल्लाद्दीन उमर सनगे | फौ.प्र.सं. चे कलम ४१ अ प्रमाणे नोटीस दिली | १९/०७/१८ | भा. दं. सं. चे कलम ४२०, ४०६, ४६५, ४७१ ५०६, ३४ | निर्दोष | निर्दोष सोडण्यात आले | काही नाही. |

## अभियोग पक्षाचे साक्षीदार

| | | | |
|---|---|---|---|
| सा. क्र.१ | डॉ. हसनमियॉ इब्राहिम कुरवले | निशाणी क्र.३१ | फिर्यादी |

## आरोपी तर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

## न्यायालयीन साक्षीदार

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

## अभियोग पक्षातर्फे सिध्द करण्यात आलेले दस्त

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

## आरोपीतर्फे सिध्द करण्यात आलेले दस्त

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

## न्यायालयातर्फे निशाणी दिलेले दस्त

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

## मुद्देमाल

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

आरोपीची प्रस्तुत खटल्याद्वारे भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ४२०, ४०६, ४६५, ४७१, ५०६ सह कलम ३४ अन्वये संपरीक्षा घेण्यात आली.

२. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीगत अशी आहे की, फिर्यादी व आरोपी हे मुळचे जसवली, श्रीवर्धन येथील रहिवासी आहेत. आरोपी क्र.१ ही फिर्यादी यांची वहिनी आहे.

३. माहे सप्टेंबर २०१० ते २५/०१/२०१८ या दरम्यान फिर्यादी यांची वडीलोपार्जीत मिळकत घर क्र.१३८ हे घर आरोपी क्र.१ यांनी आरोपी क्र.२ व आरोपी क्र.३ यांच्या सोबत संगनमत करुन खोटे कागदपत्र तयार करुन सदरची घर मिळकत खोटे असेसमेंट करुन आरोपी क्र.१ ने तिच्या नावे करुन घेतली. तसेच फिर्यादी यांच्या वडीलोपार्जीत गट क्र.३९७, ४०६, ३९५ या मिळकतींचे फिर्यादी व त्यांचे भाऊ–बहिण हे वारस असताना सर्व आरोपींनी संगनमत करुन तलाठी सजा जसवली येथे खोटा अर्ज देवून तसेच खोटा वारस पंचनामा तयार करुन नमुना नं.९(नियम १४ व २४) चे फॉर्म मध्ये खोटी माहिती देवून फेरफार क्र.८०७ अन्वये फिर्यादी यांचे वडील इब्राहिम इस्माईल कुरवले यांचे वारस लावण्यासाठी खोटा वारस पंचनामा तयार केला व त्या करिता नमुना १२ वर दमदाटी करुन फिर्यादी यांची सही करुन फिर्यादी यांची फसवणुक केली. आरोपींच्या कृत्यावरुन फिर्यादीने दि.२५/०१/२०१८ रोजी श्रीवर्धन पोलिस स्टेशन मध्ये फिर्याद दाखल केली. म्हणुन ही प्रस्तुतची फिर्याद.

४. सदर फिर्याद आधारे श्रीवर्धन पोलीस ठाणेत गु. र. नं.०३/२०१८ भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४०६, ४६५, ४७१, ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. श्री.पी.एन. कांबळे, पोलीस निरिक्षक श्रीवर्धन यांनी केसचा तपास करून दोषारोपपत्र दाखल केले.

५. प्रकरण चालु असताना आरोपी क्र.१ व २ मयत झाले असून दि.१०/१०/२०२२ व दि.२१/०८/२०२५ रोजी नि.क्र.१ वर आदेश पारीत

करुन त्यांच्या विरोधात प्रस्तुतची केस बंद करण्यात आलेली आहे. आरोपी क्र.३ विरुध्द नि.क्र.२८ वर भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४०६, ४६५, ४७१, ५०६ सह कलम ३४ अन्वये प्रतिकथन निश्चित केले. सदर प्रतिकथन आरोपीस वाचून व त्यांना त्यांच्या भाषेत समजावून सांगण्यात आले. आरोपीने त्यास नकार देऊन संपरिक्षेची मागणी केली.

६. अभियोगपक्षातर्फे आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी सदरच्या फिर्यादी यांची साक्ष नोंदविण्यात आली आहे.

७. यातील फिर्यादी व आरोपी यांच्यातील वाद मिटलेला असुन प्रस्तुत प्रकरणात पुरसीस निशाणी क्र.३० वर दाखल केली आहे. पुरसीसवर फिर्यादी व आरोपीची सही आहे. आरोपीचा गुन्हयाशी संबंध दर्शविणारा कोणताही पुरावा न आल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ खाली निवेदन नोंदविण्यात आले नाही.

८. अभियोग पक्षाचे कथन आणि पुरावा तसेच आरोपीच्या बचावाचा विचार करता पुढील विचाराधीन मुद्दे माझ्या निष्कर्षासाठी उपस्थित झाले असुन त्यावर माझे निष्कर्ष खालील कारणमिमांसेसह नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सप्टेंबर २०१० पासून ते दि.२५/०१/२०१८ पर्यंत मौजे जसवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथे आरोपी क्र.३ यांनी मयत आरोपी क्र.१ व २ एकमेकांशी संगनमत करुन फिर्यादी यांची वडिलोपार्जीत घर मिळकत क्र.१२८ आरोपी क्र.१ चे नावावर खोटे कागदपत्र देवून घराचा ॲसेसमेंट करुन घेवून फिर्यादी यांची फसवणूक केली म्हणून आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ४२० सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिद्ध करतो का ? | ... नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | वर नमुद कालावधी दरम्यान व ठिकाणी आरोपी क्र.३ व मयत आरोपी क्र.१ व २ यांनी एकमेकांशी संगनमत करुन फिर्यादी यांच्या वडिलोपार्जीत मालकीच्या गट नं.३९७, ४०६, ३९५ या मिळकतींना खोटा वारस पंचनामा तयार करुन स्वतःचे नावे करुन घेवून अप्रामाणिकपणे वापर केला म्हणून आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ४०६ सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिद्ध करतो का ? | ... नाही. |
| ३. | वर नमुद कालावधी दरम्यान व ठिकाणी आरोपी क्र.३ व मयत आरोपी क्र.१ व २ यांनी एकमेकांशी संगनमत करुन फिर्यादी यांची वडिलोपार्जीत गट नं.३९७, ४०६, ३९५ या मिळकतीचे फिर्यादी व साक्षीदार हे वारस असताना देखील आरोपी क्र.३ ने तलाठी सजा जसवली येथे खोटा अर्ज देवून फेरफार क्र.८०७ ने खोटा वारस पंचनामा तयार करुन खोटी सही केली म्हणून आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ४६५ सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिद्ध करतो का ? | ... नाही. |
| ४. | वर नमुद कालावधी दरम्यान व ठिकाणी आरोपी क्र.३ व मयत आरोपी क्र.१ व २ यांनी एकमेकांशी संगनमत करुन फिर्यादी यांची वडिलोपार्जीत गट नं.३९७, ४०६, ३९५ या मिळकतीचे फिर्यादी व साक्षीदार हे वारस असल्याचे माहित असताना देखील आरोपींनी स्वतः फिर्यादीचे वडील इब्राहीम इस्माईल कुरवले यांचे वारस असल्याचे भासवून नमुद मिळकतीला नाव लावण्यासाठी बनावट दस्तऐवज तयार करुन तो खरा असल्याचे भासवून स्वतःच्या फायदयासाठी वापरला म्हणून आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ४७१ | ... नाही. |

| | | |
|---|---|---|
| | सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिद्ध करतो का ? | |
| ५. | वर नमुद कालावधी दरम्यान व ठिकाणी आरोपी क्र.३ व मयत आरोपी क्र.१ व २ यांनी एकमेकांशी संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना दमदाटी केली म्हणून आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ५०६ सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिद्ध करतो का ? | ... नाही. |
| ६. | आदेश काय ? | सर्व आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

:: **<u>कारणमीमांसा</u>** :

**<u>मुद्दा क्र.१ ते ५ करीता :–</u>**

९. सर्व मुद्दे एकाच घटनेशी संलग्न असल्याने विवेचन करण्यास सोयीचे होईल तसेच त्यामुळे पुनरावृत्ती टळेल याकरिता ते एकत्रात चर्चिले आहेत.

१०. साक्षीदार क्र.१ हे सदर केसमधील फिर्यादी आहे. फिर्यादी व आरोपी क्र.३ यांनी नि.क्र.३० कडे पुरसीस दाखल करुन प्रस्तुत केसमध्ये त्यांच्यामध्ये तडजोड झाल्याचे सांगीतले आहे. त्या अनुषंगाने फिर्यादी व आरोपी क्र.३ यांच्यामध्ये कोणताही वाद राहिलेला नाही असे सांगितले आहे.

११. फिर्यादी (सा.क्र.१) यांनी त्यांचे सरतपासामध्ये असे सांगीतले आहे की, सदरच्या मिळकतींबाबत त्यांची फसवणुक झालेली नव्हती. आरोपींनी संगनमत करुन खोटे कागदपत्र तयार करुन घर क्र.१३८ आरोपी क्र.१ च्या नावावर केली नव्हती. आरोपींनी सर्व्हे क्र.३९५, ३९७, ४०६ या मिळकतीवर आरोपी क्र.१ व २

यांचे नाव लावले नव्हते. सदरच्या मिळकतीवर आज रोजी फिर्यादी यांचे नाव लावलेले असून त्यावर त्यांचा ताबा आहे. सरकारी अभियोक्ता यांनी फिर्यादी हे अभियोगपक्षास सहाय्य करीत नसलेने त्यांचा उलटतपास घेतला असता सदर उलटतपासात देखील आरोपीविरुध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आणणेस अभियोगपक्ष अपयशी ठरला आहे. उलट वरील फिर्यादीने आरोपीसोबत त्यांनी कोर्टाबाहेर तडजोड केली आहे, त्यांची आरोपी क्र.३ विरुद्ध कोणतीही तक्रार नसलेचे सांगितले आहे. यावरुन सदर साक्षीदार हा अभियोगपक्षास सहाय्य करीत नसलेचे दिसून येते.

१२. सदरच्या साक्षीदार यांच्या पुराव्यावरून आरोपी क्र.३ व फिर्यादी यांचेतील वाद मिटलेला असून तडजोड झालेली आहे असे दिसून येते व ही बाब सदर साक्षीदार यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केली आहे. त्यामुळे आरोपीविरूद्ध सदरचे साक्षीदार काहीही कथन करण्यास इच्छीत नाही असे स्पष्ट होते. सदरचे साक्षीदार यांनी घटना नाकारल्यामूळे आरोपी क्र.३ यांनी मयत आरोपी क्र.१ व २ यांच्यासोबत संगनमत करुन सदरच्या मिळकतीवर खोटे कागदपत्र तयार करुन आरोपी क्र.१ व २ यांची नावे लावून फिर्यादी यांना दमदाटी केली ही बाब सिद्ध होत नाही. अभिलेखावर कोणताही तोंडी व लेखी पुरावा आलेला नाही की, ज्या आधारे असे म्हणता येईल की, आरोपी क्र.३ यांनी भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४०६, ४६५, ४७१, ५०६ सह कलम ३४ अन्वये खालील दंडनीय गुन्हा केला आहे. सबब मुद्दा क्रमांक १ ते ५ चे निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.६ करीता</u>** :–

१३. मुद्दा क्र.१ ते ५ चे निष्कर्षावरुन आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र.६ करीता मी खालील आदेश पारीत करत आहे.

**<u>-: आदेश :-</u>**

१. आरोपी क्र.३ अल्लाउद्दीन उमर सनगे यांची भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४०६, ४६५, ४७१, ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाच्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपी क्र.३ यांचे जामिन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपी क्र.३ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७ (अ) प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/- चा वैयक्तीक जातमुचलका दयावा.

४. मुद्देमाल नाही.

५. प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांचेकडे पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर व उदघोषित करण्यात आला.)

SAMEER KADER SHAIKH
Digitally signed by SAMEER KADER SHAIKH
Date: 2026.03.12 17:38:29 +0530

दि.१२/०३/२०२६ (एस. के. शेख)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीवर्धन

# प्रमाणपत्र

मी प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की, या पी.डी.एफ. फाईल न्यायनिर्णयातील आशय हा मूळ न्यायनिर्णयातील शब्दा शब्दा प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | : | श्री. एस. के. शेख<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन जि. रायगड. |
| लघुलेखकाचे नाव | : | श्री. राहुल सुनिल मराठे<br>लघुलेखक–(श्रेणी–३) |
| न्यायनिर्णयाची दिनांक | : | १२/०३/२०२६ |
| पिठासिन अधिकाऱ्यांनी न्यायनिर्णयावर स्वाक्षरी केल्याचा दिनांक | : | १२/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | : | १२/०३/२०२६ |